जा.क्र.वि.शा./निवडणूक/७०२७/२०१६
पोलीस उप आयुक्त विशेष शाखा-०१
पुणे शहर यांचे कार्यालय
दिनांक :-१६/११/२०१६

विषय :- **फौजदारी दंड प्रक्रिया संहीता १९७३ चे कलम १४४ प्रमाणे जे ज्या मतदान केंद्राचे मतदार नाहीत त्यांनी त्या मतदान केंद्रात न थांबणेबाबत आदेश.**

**आदेश.**

ज्याअर्थी मा.भारत निवडणुक आयोग, नवी दिल्ली यांचे कडील क्रमांक ३२२/ LET/FUNC/ BIEN/MT-LC-LAC/२०१६ दिनांक १९/१०/२०१६ व ECI / PN/६१/२०१६ दि. १९/१०/२०१६ लगत मा.मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडील बीआयई -२०१६/प्र.क्र. ४५९/१६/३३ दिनांक १९/१०/२०१६ रोजीचे पत्रान्वये पुणे स्थानिक प्राधिकारी मतदार संघातुन महाराष्ट्र विधान परिषदेची व्दिवार्षिक निवडणूक २०१६ चा कार्यक्रम जाहीर करण्यात आलेला आहे. दिनांक १९/१०/२०१६ रोजीपासुन आचार संहिता लागु झालेली आहे. पुणे शहर पोलीस आयुक्त कार्यक्षेत्रामध्ये १) कै.मधुकर पवळे सभागृह, पिंपरी चिंचवड मनपा बिल्डिंग पिंपरी पुणे. २) महात्मा गांधी सभागृह ६ वा. मजला जिल्हा परिषद, पुणे. ३) कॅप्टन वडके सभागृह, पुणे मनपा, बिल्डिंग पुणे. हि मतदान केंद्रे असुन दिनांक १९/११/२०१६ रोजी विधान परिषदेचे मतदान होणार आहे.

निवडणुक आयोग,भारत सरकार यांचेकडील पत्र क्रं ४६४/आय.एन.एस.टी./२००७/ पी. एल.एन-१/दिनांक ०८/०१/२००७ व दिनांक २७/०२/२००७ अन्वये प्रचार संपल्यानंतरच्या वेळेपासुन मतदान प्रक्रिया पुर्ण होईपर्यंतच्या कालावधीत राजकिय व्यक्तीवर जर ते त्या मतदान केंद्राचे मतदार नसतील तर त्या मतदान केंद्रात थांबणेबाबत प्रतिबंध करण्याबाबत सुचना दिलेल्या आहेत.

मतदान प्रक्रिया सुरळीत व शांततेत पार पडण्यासाठी सार्वजनिक शांततेला व मालमत्तेलर धोका पोहचु नये व सार्वजनिक शांतता बिघडु नये यासाठी सर्व राजकिय व्यक्तींना किंवा राजकिय पक्षांशी संबंधीत असलेल्या कोणत्याही व्यक्तीस ते ज्या मतदान केंद्राचे मतदार नाहीत त्या मतदान केंद्रात थांबणेस /वास्तव्य करण्यास प्रतिबंध करणे जरुरीचे आहे, अशी माझी खात्री झालेली आहे.

त्या अर्थी मी सुनिल रामानंद, पोलीस सह आयुक्त, पुणे शहर या आदेशान्वये फौजदारी दंड प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ मधील प्राप्त झालेल्या अधिकारान्वये असा आदेश देतो की, पुणे शहर पोलीस आयुक्त कार्यक्षेत्रात १) कै.मधुकर पवळे सभागृह, पिंपरी चिंचवड मनपा बिल्डिंग पिंपरी पुणे. २) महात्मा गांधी सभागृह ६ वा. मजला जिल्हा परिषद, पुणे. ३) कॅप्टन वडके सभागृह, पुणे मनपा, बिल्डिंग पुणे. या भागात विधान पारिषदेची निवडणुक २०१६ साठी दि.१७/११/२०१६ रोजी १८.०० वा. ते मतदान प्रक्रिया पुर्ण होई पर्यंत खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

१. सर्व राजकिय व्यक्ती किंवा राजकिय पक्षांशी संबधित कोणतीही व्यक्ती ते ज्या केंद्राचे मतदार नाहीत त्या मतदान केंद्रात थांबणेस/वास्तव्य करणेस प्रतिबंध करण्यात येत आहे.

सदरच्या आदेशाचे उल्लघंन करणारी व्यक्ती भा.द.सं.कलम १८८ अन्वये कारवाईस पात्र राहील.

सदरचा आदेश माझे स्वाक्षरी व शिक्क्यानिशी आज दिनांक १५/११/२०१६ रोजी देण्यात आला आहे.